संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# टाईमबॉम्ब ठरणारे दहशतीचे नवे मॉड्यूल

रोज बदलत असलेल्या परिस्थितीचा गैरफायदा घेणारे सक्रिय झालेले आहेत. अगदी दोनच दिवसांपूर्वी आम्ही याच स्तंभामधून 'अंतर्गत सुरक्षिततेला आव्हान ठरणारे टाईमबॉम्ब' या मथळ्याखाली मजकूर लिहीला होता. बाह्य सुरक्षेपेक्षाही अंतर्गत सुरक्षा पुन्हा एकदा तसा चिंतेचा विषय होत आहे, हे मांडण्याचा आम्ही प्रयत्न केला. विशेषतः देशाला अस्थिर करणारे घटक पुन्हा कार्यरत झालेले आहेत. दहशतवादी कृत्ये करणाऱ्यांना देशातल्या सहानुभूतीदारांची मोठी साथ मिळते आहे. विशेषतः दिल्लीतल्या कारबॉम्बस्फोटामध्ये पुन्हा एकदा देशामध्ये मोठे काहीतरी षड्यंत्र घडवून आणायचे अशा हालचाली सुरू झाल्या. राज्यातल्या वेगवेगळ्या भागात तिथल्या परिस्थितीचा अंदाज घेऊन आपले उद्दिष्ट साध्य करण्याची कारस्थाने सुरू झालेली आहेत. आणि ही कारस्थाने म्हणजेच केव्हाही, कुठेही फुटू शकणारे टाईमबॉम्ब आहेत असे आम्ही त्यात स्पष्टपणे म्हटले होते. हा मजकूर लिहिल्यानंतर पुढच्या काही दिवसांतच दिल्ली पोलिसांनी पाकिस्तानच्या आयएसआय पुरस्कृत एका मोठ्या दहशतवादी हल्ल्याचे मॉड्यूल उद्ध्वस्त केले. यासंबंधात नऊ जणांना अटक झाली. विशेष म्हणजे मुंबईतल्या गुन्हेगारी टोळ्यांमार्फत या कारस्थानाची अंमलबजावणी होणार होती. मुंबईतील दाऊद इब्राहिमचा साथीदार मुन्ना झिंगाडा हा त्यातला मुख्य सूत्रधार असल्याची माहिती समोर येते आहे. दिल्ली, मुंबईसकट राज्यातल्या मोठ्या शहरांमध्ये दहशतवादी हल्ले घडवण्याचा कट आखला गेला होता. दिल्ली पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्र, हँडग्रेनेड आणि बरीच स्फोटक सामुग्री जप्त केली. विशेषतः दिल्लीतील महत्त्वाची सरकारी कार्यालये तर मुंबईतल्या मंत्रालय परिसराबरोबरच अनेक धार्मिक स्थळं आणि सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी हल्ले घडवण्याचा कट होता. वेगवेगळ्या नावाने इन्स्टाग्राम अकाऊंट उघडून हे आठही जण एकमेकांच्या संपर्कात असायचे. त्यांना पाकिस्तानच्या आयएसआयकडून पैसा उपलब्ध होत होता. दिल्ली काहीशा शांत भागामध्ये एक फ्लॅट घेऊन तिथून या सगळ्या हल्ल्याचे सूत्रसंचालन केले जाणार होते. या सर्वांपर्यंत पैसे पोहोचवण्याचे काम एकेकाळी दाऊद इब्राहिमचा जवळचा हस्तक असलेल्या या गुंडाकडे सोपवण्यात आलेले होते.

### पुन्हा मुंबई दिल्ली टार्गेट

ज्या पद्धतीने दहशत माजवून एकाचवेळी हाहाःकार निर्माण करण्याचा प्लॅन लक्षात घेतला तर मोठ्या प्रमाणावर जीवितहानी घडवण्याचाच मुख्य उद्देश दिसून येतो. कारण त्यांच्याकडे सापडलेल्या हँडग्रेनेडचा संदर्भ लक्षात घेतला तर २६ नोव्हेंबरला मुंबईत घडवलेल्या दहशतवादी हल्ल्याप्रमाणेच हाही हल्ला घडवण्याचा त्यांचा कट होता. दोन दिवसांपूर्वी पहाटे एक वाजता दिल्ली पोलिसांनी पंजाबला जाणारी एक कार अडवली ज्यामध्ये शस्त्र सापडली. त्यानंतर चौकशीची चक्रे फिरली आणि एकमेकांशी संपर्कात असलेल्या या नऊ जणांच्या टोळीचा शोध लागला. मुंबईत आतापर्यंत मोठे दहशतवादी हल्ले झाले ते दाऊद इब्राहिमच्या मदतीने घडवले गेल्याचे चौकशीत स्पष्ट झाले होते. मग अगदी १९९० च्या दशकातील बॉम्बस्फोट असो. २००८ चा २६ नोव्हेंबरचा दहशतवादी हल्ला असो किंवा २०११-१२ चे मुंबईतले बॉम्बस्फोट असोत. या सर्वांमागे स्थानिक गुंडटोळ्यांचा सहभाग होता. २६ नोव्हेंबरच्या हल्ल्यातील दहा दहशतवाद्यांना मुंबईत गेट वे वर सुखरूप पोहोचवण्यात दाऊद इब्राहिम टोळीचा हात असल्याचे निष्पन्न झाले होते. काहीशी तशीच मोडस ऑपरेंडी वापरून आताचे मॉड्यूल तयार केले गेले. खरे तर या प्रकाराची माहिती मुंबई पोलिसांनाही मिळणे आवश्यक होते. जर दिल्ली पोलिसांकडे ही सतर्क मोहीम पार पाडली गेली नसती, तर मुंबई पुन्हा एकदा दहशतवादी हल्ल्यांनी हादरली असती. या नव्या देशभर अस्थिरता माजवणाऱ्या कटाची गांभीर्य लक्षात घेतली तर मुंबई पोलिसांनी खूप सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. आता जरी या आठ जणांना अटक झाली असली तरीसुद्धा त्यांचेच काही हस्तक देशाच्या वेगवेगळ्या भागात काही ना काही कुरापती करण्याची शक्यता आहे. म्हणूनच देशभर विशेष अलर्ट दिला गेला आहे. अतिशय वेगळ्या पद्धतीने आणि आपले संवाद इंटरसेप्ट होणार नाहीत किंवा सुरक्षा यंत्रणांना त्याचा संशय येणार नाही याची पूर्ण दक्षता घेऊन या हल्ल्याची तयारी सुरू होती. अनेक ठिकाणची रेकी झाल्याचेही चौकशीत निष्पन्न झालेले आहे.

### देशातील छुपे शत्रू

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानची आयएसआय एजन्सी आणि तिथले दहशतवादी अड्डे पुन्हा भारतविरोधी कारस्थाने आखू लागली आहेत. त्यातही भारत सरकारने ऑपरेशन सिंदूर थांबवलेले नाही. पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या कार्यक्रमात बोलताना लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी संयुक्त कारवाई पुन्हा यशस्वी होऊ शकते असा दावा केला. त्यांनी भारताची तीनही दलं एकत्रित मोहीम यशस्वी करतात आणि आमची ऑपरेशन सिंदूर २ ची तयारी सुरू आहे, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. जिथून या हल्ल्यांची सूत्रं हलवली जात आहेत तिथे पुन्हा एकदा वज्राघात करण्याची वेळ येऊ शकते. असेच हवाई दल प्रमुखांच्या विधानातून स्पष्ट होते. याचा अर्थ देशांतर्गत सुरू असलेली ही दहशत निर्माण करणारी कारस्थाने म्हणजे पुन्हा छुप्या युद्धाचाच भाग ठरतो. त्यांना मदत करून आपले षड्यंत्र यशस्वी करण्याचा पाकपुरस्कृत डाव ठरतो. ऑपरेशन सिंदूर जरी झाले असले तरी देशाच्या अनेक भागांतले हे छुपे युद्ध घडवणारे हेच ते टाईमबॉम्ब आहेत, आणि ते सतत जागृत राहूनच नेस्तनाबूत करावे लागतील. टाईमबॉम्बचे हे नवे मॉड्यूल पूर्वीपेक्षा अधिक थरारक असण्याची शक्यता होती. कारण यात अतिमहत्त्वाच्या सरकारी इमारतींना टार्गेट करून अफरातफरी निर्माण करण्याचाही हेतू होता. त्यात देशातील अणूप्रकल्प, विमानतळ, रेल्वे स्थानके, ऊर्जा प्रकल्प, या ठिकाणांना टार्गेट केले जाणार होते. यात नऊ जणांना जरी अटक झाली असली तरी त्यांना सहाय्य करणाऱ्या देशांतील छुप्या शत्रूंना कठोरपणे शोधून काढायला हवे आणि कठोर शिक्षाही व्हायला हवी.